THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 1st AUGUST 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८९५ चा आक्टाचा मसुदा नंबर २.

#### सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी सन १८७६ व सन १८८० च्या मुंबईच्या रेव्हेन्यु हुकुमतीच्या आक्टांवरून आणि सन १८९१ चा कायदे रद्द करण्याबाबद व सुधारण्याबाबद आक्ट यावरून सुधारलेला सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारणें योग्य आहे, आणि ज्या अर्थी सन १८९२ चा हिंदुस्तानचा कौन्सिलांबाबद आक्ट याच्या ५ व्या कलमावरून फर्माविल्याप्रमाणें आली जनाब गव्हर्नर जनरल यांची हा आक्ट पास करण्यासाठीं पूर्वी मंजूरी मिळविलेली आहे, त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे:—

१. या आक्टास "सन १८९१ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट" असें ह्मणावें. लहान सरनामा.

२. वर सांगितल्याप्रमाणें सुधारलेला सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट याच्या २२ व्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांत "कोणी मनुष्य राणी सरकारचा रैयत असून त्याणें" या शब्दांच्या ऐवजीं खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे: कलम २२ याची सुधारणूक.

"जो कोणी मनुष्य राणी सरकारचा किंवा मल्लिका माआझमांच्या सार्वभौम सत्तेखालीं असणाऱ्या हिंदुस्तानांतील एकाद्या देशी राजाचा अथवा संस्थानाचा रैयत नसेल व याशिवाय ज्याणें".

३. वर सांगितल्याप्रमाणें सुधारलेल्या सदहू आक्टाच्या ३२ व्या कलमाच्या विशेष ठरावाच्या (ब) रकमेऐवजीं खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे:— कलम ३२ याची सुधारणूक.

"(ब) (१) दिवाणी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्याचें कलम ४९६ याच्या शेवटच्या पारिग्राफाअन्वयें नेमलेला कोर्टाचा एकादा अमलदार,

(२) सन १८९० चा पालनकरणारे व वार्ड यांबाबद आक्ट याअन्वयें कोर्टानें ज्या सरकारी अमलदारास त्याच्या हुद्याच्या नात्यानें, एकाद्या

अल्पवयीमनुष्याच्या शरीराचा किंवा मिळकतीचा, अगर त्याचें शरीर व मिळकत या दोहींचा पालनकरणारा ह्मणून नेमिलें असेल किंवा ठरविलें असेल, तो अमलदार,

अशा नेमणुकीच्या किंवा ठरावाच्या सबबेनें सदर्हू प्रकारच्या दाव्याचा पक्षकार आहे या कारणानें."

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८६९ चा मुंबईचे सिविल कोर्टांचा आक्ट याच्या २२ व्या कलमाअन्वयें, कोणताहि मनुष्य राणी सरकारचा रैयत असल्याशिवाय त्यास मुंबई इलाख्यांत सबॉर्डिनेट जज्ज नेमतां येत नाहीं. परंतु या इलाख्यांत प्राव्हिंन्शियल सर्व्हिसच्या न्यायखात्याची शाखा लौकरच स्थापन करावयाची आहे त्या शाखेंत, देशी संस्थानांचे रैयत असणाऱ्या मनुष्यांस चाकरीस ठेवण्यास या कलमावरून जेथवर प्रतिबंध होण्यासारखा असेल, तेथवर हें कलम कंपेंश करणें इष्ट आहे असें हिंदुस्तान सरकारास वाटलें आहे. असा जो कोणताहि प्रतिबंध होण्यासारखा असेल तो या मसुद्याच्या २ ऱ्या कलमावरून दूर होईल.

२. मागाहून झालेल्या कायद्यांवरून सुधारलेल्या सदर्हू आक्टाच्या ३२ व्या कलमाअन्वयें, कोणत्याहि दाव्यांत कलेक्टर किंवा इतर कोणताहि सरकारी अमलदार पक्षकार असल्यास, व केवळ अल्पवयीमनुष्याचा पालनकरणारा या नात्यानेंच तो दावा करीत असला किंवा त्याजवर दावा करण्यांत आला तथापि, असा दावा डिस्ट्रिक्ट कोर्टाशिवाय इतर कोणत्याहि कोर्टांत मांडतां येत नाहीं. अल्पवयीमनुष्याचा दावा डिस्ट्रिक्ट कोर्टांत आणल्यापासून कोणता फायदा तर होत नाहींच; परंतु उलट, [ अल्पवयीमनुष्याच्या ] इस्टेटीवर ज्यास्त खर्च पडतो; कारण लांबलांबच्या ठिकाणांपासून साक्षीदार आणावे लागतात, सबॉर्डिनेट कोर्टांपेक्षां डिस्ट्रिक्ट कोर्टांत वकिलांच्या फी ज्यास्त असतात, आणि डिस्ट्रिक्ट कोर्टांच्या निवाड्यावर फक्त हैकोर्टाकडेस अपील चालत असल्यामुळें पक्षकारांची आणखी गैरसोय होते व त्यांना आणखी खर्च सोसावा लागतो.

शिवाय, विद्यमान कायद्याप्रमाणें डिस्ट्रिक्ट कोर्टाकडे बरेच क्षुल्लक दावे इतके असतात कीं त्यामुळें त्या कोर्टांवर फारच काम पडतें.

यास्तव, ज्या दाव्यांमध्यें असे अमलदार केवळ पालनकरणारे या नात्यानेंच पक्षकार असतील ते दावे सबॉर्डिनेट कोर्टांत मांडतां यावे व त्यांचा निकाल त्या कोर्टांस करतां यावा अशी या मसुद्याच्या ३ ऱ्या कलमांत योजना केली आहे.

मुक्काम पुणें, तारीख २२ वी जुलै, सन १८९५.

(सही) एच्. बर्डवुड.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

## सन १८७९ चा परमुलकांतील हुकुमत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयींचा आक्ट सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी सन १८७९ चा परमुलकांतील हुकुमत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयींचा आक्ट सुधारणें इष्ट आहे, त्याअर्थी, ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहेः—

१. सन १८७९ चा परमुलकांतील हुकुमत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयींचा आक्ट ह्याच्या ११ व्या कलमांत खालील मजकुर जास्त दाखल करावा :— सन १८७९ चा आक्ट २१वा ह्याच्या ११ व्या कलमांत जास्त मजकुर दाखल करणें.

"इंपीरियल सर्व्हिस ट्रुप्स नामक लष्कराच्या कोणत्याही तुकडींतून फरारी होणें ह्यास अपराध समजलें पाहिजे, आणि त्या अपराधाच्या संबंधानें ती तुकडी ज्या संस्थानाची असेल त्या संस्थानाच्या पोलिटिकल एजंटास ह्या कलमाअन्वयें वारंट करण्याचा अधिकार आहे."

२. सदरहू आक्टाच्या १२ व्या कलमांत, "आणि आरोपित मनुष्यास धरल्यावर," ह्या शब्दांनंतर, "त्याला लगत पुढच्या कलमाच्या ठरावाअन्वयें जामिनावर न सोडल्यास" हे शब्द दाखल करावे. सन १८७९ चा आक्ट २१ वा ह्याच्या १२ व्या कलमाची सुधारणा.

३. सदरहू आक्टाच्या १२ व्या कलमानंतर खालील कलमें दाखल करावीं, तीं येणेंप्रमाणें:— सन १८७९ चा आक्ट २१ वा, ह्याच्या १२ व्या कलमानंतर नवीन कलमें दाखल करणें.

"१२ अ. कलम ११ अन्वयें कोणत्याही मनुष्यास धरण्यासाठीं वारंट करणाऱ्या कोणत्याही पोलिटिकल एजंटास, त्याच्या नजरेस येईल तर, त्या वारंटावर शेरा लिहून असा हुकुम करण्याचा अधिकार आहे कीं, त्या वारंटांत निर्दिष्ट केलेल्या अमलदारासमोर निर्दिष्ट केलेल्या वेळीं हजर राहण्याबद्दल त्या मनुष्यानें पुरेशा जामिनांनिशीं खत लिहून दिलें तर, तें वारंट ज्या माजिस्ट्रेटाच्या नांवाचें असेल त्या माजिस्ट्रेटानें तें तारण घेऊन त्या मनुष्यास कैदेंतून सोडून दिलें पाहिजे. तारण घेण्याविषयीं हुकुम करण्याचा पोलिटिकल एजंटास अधिकार, आणि नंतर काम करें चालवावयाचें तें.

"सदरहू शेऱ्यांत, (अ) जामीन घ्यावयाचे असल्यास त्यांची संख्या, (ब) ते जामीन व ज्या मनुष्यास धरण्यासाठीं तें वारंट केलेलें असेल तो मनुष्य ह्यांस अनुक्रमें किती रकमेबद्दल बांधून घ्यावयाचें ती रकम आणि (क) वारंटांत निर्दिष्ट केलेल्या अमलदारासमोर त्या मनुष्यास ज्या वेळीं व जागीं हजर राहावयाचें असेल, ती वेळ व जागा, ह्या गोष्टी लिहिल्या पाहिजेत.

"ह्या कलमाअन्वयें तारण घेण्यांत येईल त्या प्रत्येक प्रसंगीं त्या माजिस्ट्रेटानें त्या गोष्टीबद्दलचा दाखला, तें वारंट ज्या पोलिटिकल एजंटानें केलें असेल त्याकडे पाठवून खत आपल्याजवळ ठेविलें पाहिजे.

१२ ब. गेल्या शेवटल्या कलमाअन्वयें करून दिलेल्या कोणत्याही खतावरून, अशा खतांत सांगितलेल्या अमलदारासमोर हजर राहण्यास बांधिलेला मनुष्य त्याप्रमाणें हजर राहिला नाहीं तर, त्या मनुष्याच्या कसुरीबद्दल त्या माजिस्ट्रेटाची खात्री झाल्यास त्यास, त्या मनुष्याला पुनः धरून सदरहू अमलदाराच्या स्वाधीन करण्याबद्दल वारंट करण्याचा अख्त्यार आहे. हजर होण्याबद्दलच्या खताच्या शर्तीचा भंग झाला म्हणजे धरणें.

"१२ क. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याबाबद आक्ट ह्याच्या ५१३ व्या व ५१४ व्या कलमांचे ठराव, वरील ठरावांअन्वयें जें खत करून देण्याविषयीं फर्माविलें असेल अगर जें खत करून दिलेलें असेल, त्या प्रत्येक खतास लागू आहेत असें समजावें. सन १८८२ चा आक्ट १० वा, ह्याचीं ५१३ व ५१४ हीं कलमें लागू करणें.

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

इंपीरियल सर्व्हिस कोर नामक पलटणींतून फरारी झालेल्या मनुष्यास ब्रिटिश हिंदुस्थानांतून स्वाधीन करून घेण्यास हल्लीं कोणताही कायदेशीर अधिकार नाहीं. हीं पलटणें मलिका मआज्झमांच्या फौजेचा एक भाग व्हावा ह्मणून तीं कांहीं देशी संस्थानांच्या खर्चानें ब्रिटिश अमलदारांच्या देखरेखीखालीं उभारलेलीं असून त्यांस कवाईत शिकविली जात आहे व तीं त्याप्रमाणें चालू राखण्यांत येत आहेत. ह्मणून, त्या पलटणींतून फरारी झालेल्या लोकांस ब्रिटिश हिंदुस्थानांतून स्वाधीन करून घेण्याच्या संबंधानें ठराव केला पाहिजे हें वाजवी दिसतें. ह्या मसुद्याचा हेतु हा आहे कीं, फरारी होणें हा गुन्हा ठरवून त्याच्या संबंधानें धरण्याचीं वारंटें करितां यावीं अशा तऱ्हेची सुधारणा सन १८७९ चा परमुलकांतील हुकुमत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें: यांविषयींचा आक्ट, ह्याच्या ११ व्या कलमांत करून, ह्या बाबतीमध्यें, (अपराध्यांस) स्वाधीन करून घेण्याचा जरूर असलेला अधिकार पोलिटिकल एजंटास द्यावा.

पुष्कळ क्षुल्लक प्रकारचे अपराध करणाऱ्या मनुष्यांस (कायद्यावरून) स्वाधीन करून घेतां येतें, परंतु सन १८७९ चा परमुलकांतील हुकुमत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयींच्या आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें कोणत्याही पोलिटिकल एजंटानें केलेल्या वारंटावरून धरलेल्या मनुष्यास जामिनावर सोडण्याबद्दल त्या आक्टांत ठराव नाहीं. हा दोष दूर करण्यासाठीं, वारंटाअन्वयें पकडलेला इसम, आपण योग्य रीतीनें हजर राहण्याबद्दल माजिस्ट्रेटची खातरी होईल असें तारण देईल तर त्यास फौजदारी काम चालविण्याच्या रीतीबाबदच्या कायद्याच्या ज्या ठरावावरून सोडून देतां येतें, ते ठराव सदहू आक्टांत दाखल करण्याचें ह्या मसुद्यावरून योजिलें आहे.

तारीख ९ जुलई सन १८९५.

(सही) ए. ई. मिलर.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.